P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक - ११/१२/२०२३

## दि.१०/१२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ११८५/२०२३, भा.द.वि.कलम १४३,१४६,१४७,१४९,३२४,५०४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०८/१२/२०२३ रोजी २२/३० वा. चे सुमारास ग्लोबल हॉस्पीटलच्या पार्कींगमध्ये काळेवाडी फाटा, वाकड पुणे

गुन्हा दाखल :- दि.१०/१२/२०२३ रोजी १९/५५ वा

फिर्यादी :- अमोल भास्कर जावळे वय- ३३ वर्ष धंदा- व्यवसाय रा सर्वे नं १२/१९/२ पवार नगर थेरगाव पुणे

आरोपी :- आते भाउ -१.संदिप बबन सोनवणे वय-३२ वर्षे, धंदा-फायब्रिकेशन रा. सर्वे नं. १२/९/२ , दुर्वाकुर बिल्डींग समोर, पवारनगर थेरगाव पुणे , २.आशितोष बबन सोनवणे, वय-२८ वर्षे, धंदा- नोकरी, रा. सदर
३. प्रदिप राजेंद्र शिंदे, वय - ३० वर्षे, रा. पडवळनगर, रा. रहेमानी मज्जिद शेजारी, थेरगाव, पुणे
४. इतर ३ ते ४ आरोंपीचे साथीदार नाव, पत्ता माहीत नाही, **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची आत्या व आरोपी क्रं १ यांनी फिर्यादीस फोन करुन आम्हाला तुला भेटायचे आहे. असे म्हणाल्याने फिर्यादी यांनी त्यांना मी ग्लोबल हॉस्पीटल येथे आहे येथे भेटायला या असे सांगितले. दोघे फिर्यादीस भेटायला ग्लोबल हॉस्पीटल येथे आल्यावर फिर्यादीने त्यांना आपले जुने वाद हे उदया बसुन मिटवु असे बोलणे चालु असताना आरोपी क्रं १ याने फिर्यादीस व फिर्यादीचा चुलत भाउ दुशांत याला शिवीगाळ केली व लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच दुशांत याचे लग्न होवु देणार नाही अशी धमकी दिली .तसेच इतर आरोपी मजकुर यांना हॉस्पीटल येथे बोलावुन घेतले त्यांनंतर आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस व फिर्यादीचे भावाला लाथाबुक्कंयानी मारहाण केली शिवीगाळ केली. व फिर्यादीस मारुन टाकेल अशी धमकी दिली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- जे. एस. गिरनार , पोलीस उप-निरीक्षक,९८८१०९७७१९

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ११९७ /२०२३भा.द.वि कलम ३५३,३३२,५०४ महाराष्ट्र वैदयकिय सेवा व्यक्ती आणि वैदयकिय सेवा संस्था ( हिंसक कृत्य व मालमत्तेचे हानी यांना नुकसान व प्रतिबंध) अधिनियम -२०१० चे कलम ३ व ४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/१२/२०२३ रोजी १४.११ वा. आयसीयु वार्ड क्रं.०३ वायसीएम हॉस्पीटल, पिंपरी

गुन्हा दाखल :- दि.१० /१२/२०२३ रोजी २३/४९ वा

फिर्यादी :- डॉ. ऋषीकेश हनमंत कुदळे, वय.२५ वर्षे, धंदा. डॉक्टर,सध्याचा पत्ता. ०७ वा मजला, वायसीएम हॉस्पीटल, रुम नं जी-३, पिंपरी पुणे मुळ पत्ता. कोटेश्वर कॉलणी शुक्रवारपेठ,

आरोपी :- महेश राजाराम कुंभार वय.२५ वर्षे रा.वाघोली, ता.वरुड जि.धाराशिव
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी आयसीयु वार्ड क्रं.०३ मध्ये वैदयकिय उपचार देण्याचे कर्तव्यास असताना दुपारी १४.११ वा. पेशंट नामे राजाराम कुंभार हे उपचारदरम्यान मयत झाल्याने सदरची माहिती त्यांच्या नातेवाईकांना दिली असता पेंशटचा मुलगा नमुद आरोपी हा सदर वार्डमध्ये आला त्याने फिर्यादीकडे पेशंट च्या मयताबाबत विचारपुस केली व मयत वडीलांकडे जावुन तेथे थोडावेळ रडला फिर्यादी हे शासकिय कर्तव्य करीत असताना आरोपी याने रागारागत फिर्यादीकडे येवुन मोठयाने ओरडुन फिर्यादीचा हात पकडुन हातास हिसका देवुन फिर्यादीचे गालात दोन चापटा मारुन अश्लिल शिवीगाळ केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सहा पोलीस निरिक्षक कैलासे ७७२०९२३९७७

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ११८४/२०२३, भा.द.वि.कलम १४३,१४६,१४७,१४९, ३२४,५०४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०८/१२/२०२३ रोजी १४/३० वा. चे सुमारास सर्वे नं. १२/९/२ ,दुर्वांकुर बिल्डींग समोर, पवारनगर थेरगाव पुणे व रात्री २२/३० वा. चे सुमारास ग्लोबल हॉस्पीटलच्या पार्कींगमध्ये काळेवाडी फाटा, वाकड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१० /१२/२०२३ रोजी १९/२८ वाजता |
| फिर्यादी | :- | संदिप बबन सोनवणे वय-३२ वर्षे, धंदा-फायब्रिकेशन रा. सर्वे नं. १२/९/२ , दुर्वांकुर बिल्डींग समोर, पवारनगर थेरगाव पुणे |
| आरोपी | :- | १)अमोल भास्कर जावळे वय- ३६ वर्ष रा अभय पार्क गुजरवस्ती थेरगाव<br>२)महीला आरोपी<br>३) महीला आरोपी<br>४) दुशांत सुधाकर जावळे वय-२८ वर्ष रा पडवळनगर थेरगाव<br>५) रोहन सरोदे वय- २८ वर्ष अंदाजे रा गणपती मंदीराजवळ पडवळनगर थेरगाव<br>६) रोहन गवळी वय- ३० वर्ष अंदाजे रा क्रांतीवीरनगर थेरगाव व इतर ३ ते ४ त्यांचे साक्षीदार नाव पत्ता माहीत नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मामे भाउ आरोपी क्रं १ याचे सांगण्यावरुन आरोपी क्रं २ व ३ यांनी जुन्या भांडणाचे कारणावरुन फिर्यादीचे घरी येवुन फिर्यादीचे पत्नी हिला शिवीगाळी केली .तसेच फिर्यादी व फिर्यादीची आई ग्लोबल हॉस्पीटल काळेवाडी फाटा येथे गेले असता आरोपी क्रं १ व ४ यांनी चिडुन जावुन फिर्यादीची गचंडी धरुन फिर्यादीस हाताने, लाथाबुक्यांने मारहाण केली. आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस शिवीगाळी करुन हाताने, लाथाबुक्याने मारहाण केली व फिर्यादीचे छातीवर बुक्या मारुन फिर्यादीचे आईला देखील ढकलुन दिले. फिर्यादीला वाचविण्यासाठी फिर्यादीचा लहान भाऊ आशुतोष सोनवणे व मावस भाऊ प्रदिप राजेंद्र शिंदे वय-३० वर्षे, रा. पडवळनगर हे मध्ये आले असता आरोपी मजकुर यांनी त्यांना देखील मारहाण केली. व ते लोक तेथुन पळुन जावु लागले. म्हणुन फिर्यादी त्यांच्यामागे धावत गेले असता, काळेवाडी फाटा बीआरटीमध्ये आरोपींनी पुन्हा फिर्यादीस हाताने मारहाण केली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | जे. एस. गिरनार ,पोलीस उप-निरीक्षक |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १३८६/२०२३ भा.द.वि.क. ३८१ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १६/१०/२०२३ रोजी ००.०० वा ब्ल्युरीच टॉवर द ओरीयन येथे कंन्स्ट्रक्शन साईट हिंजवडी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. १०/१२/२०२३ रोजी ०१.५१ वा. |
| फिर्यादी | :- | किरण दत्तात्रय पालखे वय ३९ वर्षे धंदा-नोकरी रा. अपनाघर सोसायटी पॅसीफीक मॉल च्या समोर<br>शंकरशेठ रोड स्वारगेट पुणे |
| आरोपी | :- | कैलास गंगाधरराव देशमुख वय- २९ वर्षे रा.जगदंबा मार्ग उंड्री **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादी यांचे ब्ल्युरीच टॉवर द ओरीयन येथे कंन्स्ट्रक्शन साईट वर काम करत असताना बांधकामासाठी येणारी किं रु ६१,०००/- रु ची १००० किलो १८ गेज लोखंडी वायर ही स्वतः कंपनीचा कर्मचारी असताना चोरीच्या इराद्याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चोरी करुन विकले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि काकडे ९९१५७७२४६४ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ७९० /२०२३ भा.दं.विकलम- २८५, २८६ सह जिवनावश्यक वस्तुचा कायदा १९५५ चे कलम ३,७ सह स्फोटक पदार्थ अधिनियम सन १९०८ चेकलम ५. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/१२/२०२३ रोजी १८.४५ वा. चे सुमारास चिखली पोलीस स्टेशन हदीत मोरे वस्तीमधील नाना मोरे यांचे शेताजवळ अजय जैन याच्या मालकीचे १०ु१५ च्या पत्र्याच्या शेडमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.१० /१२/२०२३ रोजी ०२/१४ वा. |
| फिर्यादी | :- | प्रसाद राजन्ना जंगीलवाड पोलीस शिपाई/१४८६, ने. अं.प.वि.प.गुन्हे शाखा. पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | १) सागर रमेश वाघमारे वय २५ वर्ष धंदा मजुरी रा. पाचाने यांच्या खोलीत, अंगनवाडी सोसायटी, मोरेवस्ती, चिखली, पुणे<br>२) अजय जैन रा. चिंखली<br>३) मुकेश ट्रेडर्स, कुदळवाडी, चिखली<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ याने त्याचा मालक आरोपी क्रं २ याचे सांगणे वरुन व आरोपी क्रं ३ यांच्या कडुन त्यास कोणत्याही प्रकारची परवाणगी नसतांना छोटया गॅसच्या टाक्या विकत घेवुन घरगुती वापराचे भरलेल्या गॅस सिलेंडर मधुन रिफीलच्या सहाय्याने घरगुती वापराचा गॅस अवैधरित्या कोणतीही खबरदारी न घेता लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल हे माहित असुन सुध्दा मानवी जिवीतास पोहचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासुन सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करणे गरजेचे असताना, ज्वालाग्राही पदार्थाबाबत पुरेसा इतका बंदोबस्त करण्याचे जाणीवपुर्वक टाळुन, त्यांचे ताब्यातील घरगुती भरलेल्या सिलेंडरमधुन इतर छोटया सिलेंडरमध्ये गॅस काढुन घेत असताना २७,३००/- रु च्या मुदद्देमालासह मिळुन आला, म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि टी एस मस्के ७७७४८२२०२६ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १०५१/२०२३ भा द वि का क ३३८,३०४(अ),२७९, मो वा का क १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/१२/२०२३रोजी १५/०० वा चे सु चाकण ते तळेगाव जाणाऱ्या रोड वर युनिकेअर हॉस्पीटल चे समोर रोड चे कडेला |
| गुन्हा दाखल | :- | दि. १०/१२/२०२३ रोजी २०/२२ वा. |
| फिर्यादी | :- | प्रविण बाबाजी दौंडकर वय ३० वर्शे धंदा शेती, रा.दौंडकर वाडी, ता.खेड,जि.पुणे |
| आरोपी | :- | सुनिल सोपान घाटे वय ३७ वर्श रा लांडेवाडी भोसरी ता हवेली जि पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने त्याचे ताब्यातील बस नं एम.एच.१४/सी.डब्लु.०८२३ ही भरधाव वेगात हयगयीने,बेदरकारपणे,रस्त्याचे परिस्थीती कडे दुर्लक्ष करून चालवुन फिर्यादी यांचे वडील नामे बाबाजी रामभाउ दौंडकर वय ५५ वर्शे यांना धडक मारुन गंभीर जखमी करुन त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सहा पो फौज राठोड |